महाराष्ट्र शासन - वन विभाग

कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल

GOVERNMENT OF MAHARASHTRA - FOREST DEPARTMENT

KUNDAL ACADEMY OF DEVELOPMENT, ADMINISTRATION AND MANAGEMENT (FORESTS), KUNDAL

क्र.ब/संकीर्ण/कोविड/४९/ २०२१-२२ दिनांक: ०९/०४/२०२१

# कोरोना विषाणू प्रतिबंधक परिपत्रक

**विषय : कोरोना प्रतिबंधक उपाय योजना करण्याबाबत**

**संदर्भ : मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील आदेश क्र.DUM/2020/CR.92/DisM-1 दि.04/04/2021**

**1) कार्यालयीन अधिकारी कर्मचारी :-**

अ) सर्व अधिकारी /कर्मचारी यांना कळविण्यात येते की, संदर्भित शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यालायीतील प्रत्येक अधिकारी /कर्मचारी यांनी भारत सरकारचे मार्गदर्शक सूचनानुसार पात्रतेनुसार लसीकरण करणे आवश्यक आहे. लसीकरण करण्यास पात्र नसल्यास त्यांनी आरटीपीसीआर चाचणी निगेटिव्ह असल्याचा अहवाल दिनांक १९ एप्रिल २०२१ पर्यंत कार्यालयास सादर करावा. तरच संबंधितांना कार्यालयात प्रवेश दिला जाईल.

ब) तसेच सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी मास्क घालणे, सुरक्षित अंतर राखणे व हात वरचेवर स्वच्छ करणे बाबत दक्षता घ्यावी.

**२) शासकीय निवासस्थांनाचा वापर करणारे अधिकारी/कर्मचारी :-**

अ) शासकीय निवासस्थानांचा वापर करणारे सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी आपली स्वत:ची आणि कुटुंबीयांची कोरोना संबंधित वरील नमूद केले प्रमाणे आरटीपीसीआर चाचणी किंवा लसीकरण दिनांक १९ एप्रिल २०२१ पर्यंत करणे आवश्यक आहे.

ब) दिनांक ३० एप्रिल २०२१ पर्यंत आपले कोणतेही नातेवाईक यांना शासकीय निवासस्थानी बोलावू नये व आपण अत्यावश्यक काम नसल्यास प्रबोधिनीच्या आवाराच्या बाहेर शक्यतो जाऊ नये.

**३) सुरक्षा रक्षक कर्मचारी :-**

अ) मेस्कोचे सुरक्षा रक्षक कर्मचारी यांनी भारत सरकारचे मार्गदर्शक सूचनानुसार पात्रतेनुसार लसीकरण करणे आवश्यक आहे. लसीकरण करण्यास पात्र नसल्यास त्यांनी आरटीपीसीआर चाचणी निगेटिव्ह असल्याचा अहवाल दिनांक १९ एप्रिल २०२१ पर्यंत कार्यालयास सादर करावा. तरच संबंधितांना प्रबोधिनीच्या आवारात प्रवेश दिला जाईल.

ब) तसेच त्यांनी मास्क घालणे, सुरक्षित अंतर राखणे व हात वरचेवर स्वच्छ करणे बाबत दक्षता घ्यावी.

क) त्यांनी प्रबोधिनीच्या आवारामध्ये कोणत्याही बाहेरील व्यक्तीस परवानगी शिवाय प्रबोधीतील प्रवेश प्रतीबंधीत करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**४) भोजनालय कर्मचारी :-**

अ) भोजनालयात काम करणारे सर्व कर्मचारी यांनी भारत सरकारचे मार्गदर्शक सूचनानुसार पात्रतेनुसार लसीकरण करणे आवश्यक आहे. लसीकरण करण्यास पात्र नसल्यास त्यांनी आरटीपीसीआर चाचणी निगेटिव्ह असल्याचा अहवाल दिनांक १९ एप्रिल २०२१ पर्यंत कार्यालयास सादर करावा. तरच संबंधितांना प्रबोधिनीच्या आवारात प्रवेश दिला जाईल.

ब) त्यांनी मास्क घालणे, सुरक्षित अंतर राखणे व हात वरचेवर स्वच्छ करणे बाबत दक्षता घ्यावी.

क) आवश्यक असणा-या वस्तूंची खरेदी करण्यासाठी संबधित पुरवठादारास प्रबोधिनीच्या गेट पर्यंत बोलावून सुरक्षा रक्षक कर्मचारी यांचे मार्फत गेटमधून मेससाठी लागणारे साहित्य ताब्यात घ्यावे. तसेच सदरचे वस्तू प्राप्त झाल्यानंतर निर्जंतुकीकरण करण्यात याव्यात.

ड) भोजनालयाची दिवसातून ३ वेळा साफ-सफाई करण्यात यावी.

**५) व्यापारी दुकानगाळे :-**

सद्यस्थितीत कोरोना विषाणूचा प्रद्दभाव वाढत असल्याने संकीर्ण विभागाने पुढील आदेशापर्यंत व्यापारी संकुल बंद राहील याची दक्षता घ्यावी.

**६) बाहय इमारत बांधकाम :-**

अ) बांधकाम कारागीर, बिगारी यांनी भारत सरकारचे मार्गदर्शक सूचनानुसार पात्रतेनुसार लसीकरण करणे आवश्यक आहे. लसीकरण करण्यास पात्र नसल्यास त्यांनी आरटीपीसीआर चाचणी निगेटिव्ह असल्याचा अहवाल दिनांक १९ एप्रिल २०२१ पर्यंत कार्यालयास सादर करावा. तरच संबंधितांना प्रबोधिनीच्या आवारात प्रवेश दिला जाईल.

ब) त्यांनी मास्क घालणे, सुरक्षित अंतर राखणे व हात वरचेवर स्वच्छ करणे बाबत दक्षता घ्यावी.

क) अभिरक्षक यांनी वरील प्रमाणे खात्री करून बांधकाम सुरु ठेवणे बाबत कार्यवाही करावी अन्यथा बांधकाम बंद करणेबाबतची कार्यवाही बांधकाम शाखेने करावी.

**७) ईशा प्रोटेक्शनल सिक्युरिटी गार्ड प्रा.ली.भोपाळ. बाहय यंत्रणा मनुष्यबळ पुरवठा :-**

अ) आपले आस्थापनेवर काम करणारे सर्व कर्मचारी यांनी भारत सरकारचे मार्गदर्शक सूचनानुसार पात्रतेनुसार लसीकरण करणे आवश्यक आहे. लसीकरण करण्यास पात्र नसल्यास त्यांनी आरटीपीसीआर चाचणी निगेटिव्ह असल्याचा अहवाल दिनांक १९ एप्रिल २०२१ पर्यंत कार्यालयास सादर करावा. तरच संबंधितांना प्रबोधिनीच्या आवारात प्रवेश दिला जाईल.

ब) त्यांनी मास्क घालणे, सुरक्षित अंतर राखणे व हात वरचेवर स्वच्छ करणे बाबत दक्षता घ्यावी.

सदर आदेश दिनांक ३०/०४/२०२१ च्या मध्यरात्री पर्यंत लागू राहील.

09/04/2021

**(जे.पी.त्रिपाठी भा.व.से.)**

**महासंचालक**

प्रती: १) कार्यालयीन सर्व अधिकारी/कर्मचारी.

२) मेस्को सुरक्षा पर्यवेक्षक / ईशा प्रोटेक्शनल सिक्युरिटी गार्ड प्रा.ली.भोपाळ, पर्यवेक्षक.

३) नोटीस बोर्ड - कार्यालय / सर्व वसतिगृह / प्रशिक्षणकेंद्र / भोजनालय / मेन गेट.



Scanned with CamScanner